# सातान्याचे प्रतिसरकार: शोध आणि बोध

डॉ दिनकर विष्णू पाटील, प्रायार्य, भोगावती महाविद्यालय, कुरुकली.

..............................................................................................................................................

**प्रस्तावना:—** भारतीय स्वातंत्र्य लढयाच्या इतिहास म्हणजेच भारतीयांच्या त्यागाचा व कामगिरीचा इतिहास होय. भारतीय स्वातंत्र्यासाठी तळहातावर शीर घेऊन प्राणाची बाजी लावणारा १९७२ च्या प्रखर आंदोलनातील प्रतिसरकारच्या तेजस्वी साहसाने भरलेला स्वातंत्र्ययुध्दाचा इतिहास हा एक महत्वाचा टप्पा होय. स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास लिहिला गेला नाही, असे नाही. घडामोडींच्या नोंदी घेतल्या म्हणजे इतिहास नव्हे पण खरा प्रतिसरकारचा इतिहास पुढे येणे गरजेचे आहे. स्वातंत्र्याची भावना ही जेव्हा श्रमिक जनतेत रुजते तेव्हा काय घडते याचा साक्षात्कार सातारच्या प्रतिसत्तेच्या चळवळीतून मिळतो. सातारा प्रतिसत्तेच्या चळवळीत महाराष्ट्रभर नव्हे तर भारतभर स्वातंत्र्यप्रेमाची उसळती लाट निर्माण झाली. आणि इंग्रज गेले व १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळून सर्वाना जगण्याचा मार्ग मोकळा झाला. जगण्याचे स्वातंत्र्य प्राप्त होण्याच्या आड येणाऱ्या शक्तीच्या विरोधात उभे राहण्याची प्रेरणा सातारच्या प्रतिसत्तेच्या चळवळीने निर्माण केली. त्यातून उफाळलेल्या श्रमजीवी जनतेने आपले नेतृत्व घडविले. त्या नेतृत्वात नवा हुरुप आणि अस्मिता तयार होत गेली. ४२ चा सातारी जनतेचा प्रतिसत्तेचा लढा चिकित्सक दृष्टीने उजेडात येणे आवश्यक आहे. म्हणून हा प्रयत्न केला आहे.

**साता—याचे पत्रीसरकार:—** ब्रिटीश सत्तेला उद्देशून ''छोडो भारत'' आणि ''चलेजाव'' अशा गगनभेदी गर्जना जेव्हा महात्मा गांधीनी ८ ऑगस्ट १९४२ रोजी केली. तेव्हा ९ ऑगस्ट पासून देशातील हजारो लोक देशाच्या अनेक भागातून शेकडो कार्यकर्ते भूमिगत झाले. आणि त्यांनी सरकारच्या अत्याचारांचा जोरदार प्रतिकार करुन सरकारी यंत्रणेला ठिकठिकाणी सुरुंग लावण्याचा प्रयत्न केला. सातारा, खानदेश, मिदनापूर, बिहार आणि बालिया या भागात भूमिगत चळवळीने विशेष जोर धरला. १९४२ चा सातारचा स्वातंत्र्य लढा गाजला. जनतेने स्वातंत्र्यासाठी उभारलेले आंदोलन हे पारतंत्र्याचे रणकुंड निर्माण करणारे होते. पण ते काही ४२ च्या ९ ऑगस्टपासूनच जन्माला आले असे नाही. ४२ साली स्वातंत्र्य आंदोलनात सातारी जनता लढली. त्या लढयाविषयी अद्यापही कुचाळकीने लिहिले जाते. बोलले जाते. या लढयातून प्रसिध्दीला आलेली व्यक्तिमत्वे सोयीप्रमाणे रंगविली जातात. लढा भूमिगत कार्यशक्तीने लढला त्यामुळे कोणाचे कर्तृत्व कोणाच्याही नावावर कोणाचे दुष्कृत्य कोणाच्याही नावावर खपविले गेले. आणि हजारो कार्यकर्ते इंग्रजी सत्तेविरुध्द लाखो संख्येने जनतेला घेऊन उभे राहिले. त्याचा ऐतिहासिक परिपाक काय? तर ही चळवळ लुटारुंची, गुंडांची, निर्बुध्दांची होती. ४२ च्या सातारा जिल्हयात झालेल्या स्वातंत्र्य चळवळीला त्या चळवळीच्या प्रतिष्ठेवर जे बलवान झाले. जगले त्यांनी जितके बदनाम केले तितके त्या चळवळीच्या हितशत्रुनेही केले नाही.१९४२ च्या लढयात उदयाला आलेले अनेक क्रांतीवीर स्वातंत्र्याच्या सर्व लढयात ग्रामीण जनतेच्या गळयातील ताईतच ठरले. ती एक सातारी जनतेच्या लढयाची प्रचंड शक्ती होती. त्या क्रांतीवीरांनी स्वातंत्र्याचे लोण खेडयापाडयात वाडी—वस्तीवर नेले. त्यांनी जी विचार आचारांची पेरणी शेतकऱ्यांच्यात केली तीच खरी सातारच्या जनतेच्या लढयाची पूर्व तयारी होती. चलेजाव चळवळ अधिक उग्र बनत होती. बॅका लुटल्या जात होत्या. सरकारी दप्तरांची ठिकठिकाणी होळी होत होती आणि गावातल्या ठग्यांचा, दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्याच कामही गुप्त मंडळीनी सुरु केलं होत. सर्वत्र धरपकड आणि झडत्या सुरु होत्या. दिसेल त्याला पकडणं एवढाच पोलीसांचा उद्योग होता. काही अट्टल गुन्हेगांराना पकडूनही पोलिसांनी कॉंग्रेसवाले पकडल्याचा डांगोरा पिटला. सरकारची इभ्रतच पणाला लागली होती भयंकर दडपशाही आणि मारहाण करुन पोलिसांनी त्यावेळी कित्येकांना आयुष्यातून उठवले. काहीच्या घरच्या मुलाबाळासह सर्वानाच तुरुंगात डांबले, पण भूमिगत चळवळ हाती लागले नाहीत. पोलीसांनी मग परंपरागत फितुरीचे प्रयोग सुरु केले आणि फितुरांमार्फत चळवळयांचा ठावठिकाणा, त्यांचे बेत यांची माहिती मिळविण्याचा प्रयत्न सुरु झाला. पोलिसांची ही हिकमत भूमिगतांच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही. भूमिगतांनी निरनिराळया कामाच्या तुकडया तयार केलेल्याच होत्या आणि सर्व सातारा जिल्हयात आणि जिल्हयाच्या बाहेर त्यांनी आपली दहशत निर्माण केली होती. राष्ट्रकार्यासाठी लागणारा पैसा, हत्यार, दारुगोळा मिळवण्यासाठी या तुकडयांनी अनेक मार्गाचा अवलंब केला. पण त्यावेळी भूमिगतांच्या नावाखाली आणि चळवळीचं निमित्त करुन गावकऱ्यांना छळणाऱ्या वर्ग, आपले उद्योग करीत असल्याचे पाहून, कार्यकर्त्यांनी त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी हत्यार उपसलं. सातारा जिल्हयाचं ''पत्री सरकार'' म्हणून त्या काळात संबंध हिंदुस्थानात जे गाजलं त्याचा उगम यांच्यातूनच झाला. पण ते होते प्रतिसरकार.

पत्री सरकार अस नामाभिमान जे प्राप्त झालं त्याचं कारण असं की, सरकार पक्षाची जी माणसं गावांला छळत असत. चहाडया करत असत त्यांना गाठून मार देण्यात येत असे फितुराला किंवा चहाडयाखोराला असा मारायचा की, तो पंगु बनला पाहिजे. त्यासाठी त्याच्या तळपायावर मार देत असत. बैलाच्या पायावर जशा पत्र्या ठोकतात त्या पध्दतीन या गावगुंडीचे फितुरांचे पाय सडकून काढले जात. इतके की, त्याला चालणेही मुष्किल होत असे. असा मार देण्यासाठी चहाडयाखोर आणि सरकारपक्षांची माणसं तर हुडकून काढली जात होतीच, शिवाय सावकारी करुन शेतकऱ्यांची पिळवणूक करणारे शेतकऱ्यांच्या घरादारावर नांगर फिरवणारे तसेच गुंडगिरी करणारे दरोडेखोर यांनाही हा प्रसाद मिळे.

कारण या सर्वांकडून चळवळीला उपद्रव सुरु झाला होता. पत्री सरकारने अशा प्रकारे दहशत निर्माण करून हे सर्व गैरप्रकार बंद केले. काही दरोडेखोरांनी भुमिगतांमध्ये घुसून धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली होती. त्यांनी काहीचे खून पाडले. तर काहींच्याकडे रक्कमेच्या मागण्या केल्या. दरोडेखोरांना सहाय्य करणारे काही गावकरी असत. अशा गावकऱ्यांना या गुप्तमंडळीकडून उघडयावर चावडीसमोर आणून बडवलं जाऊ लागलं. परंतु यामुळे भूमिगत असलेली मंडळी दरोडेखोरांचा, दारुडयांचा बंदोबस्त करतात याचबद्‌ल लोकांच्यामध्ये विश्वास निर्माण झाला आणि गुप्तपणे हिंडणा—यांची दहशतही कमालीची वाढली. या पत्री सरकारचे प्रमुख नाना पाटील हे होते, आणि त्यांच केंद्र कुंडल हे बनलं होत. नाना पाटलांच त्या काळात मोठचं प्रभुत्व निर्माण झालं, ती एक मोठी शक्ती ठरली. दरोडेखोरांच्या बंदोबस्तामुळे गुप्त मंडळीबद्‌दल व एकूणच कॉंग्रेसबद्‌दलची निष्ठा वाढलेली पाहून पोलिस अधिका—यांनीच मग दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्याचे काम सुरु केले परंतु यामुळे भूमिगतांचा मार्ग आणखी मोकळा झाला. पत्री सरकारनं आपल्या कामांची जी आखणी केली होती. ती मोठी नमुनेदार होती. गावगुंडाची कायदेशीर चौकशी करणं व त्याला गुंडगिरीपासून परावृत्त करणं. सार्वजनिक कामाचा पैसा कुणी बळकावला असेल. तर तो वसूल करुन पंचायतीत ठेवण गांवातल्या चो—या मारामा—या यांची चौकशी करुन न्याय देणं व कोणत्याही कारणासाठी ते प्रकरण कोर्टात जाऊ न देणं. अनाथ महिलांचे प्रश्न, तसेच दत्तक प्रकरण यांचा निकाल लावणं, फसवाफसवीची प्रकरणे उजेडात आणून, त्यांचा बंदोबस्त करणं अशा प्रकारच्या ग्रामीण जीवनात दैनंदिन निर्माण होणा—या व गावक—यांना उपद्रवकारक ठरणा—या गोष्टींचा बंदोबस्त करण्याच काम ही मंडळी करु लागली. त्यातून अनेकांना न्याय मिळाला आणि अनेकांचा कायमचा बंदोबस्त झाला. हे करत असतांना काही जणाकडून काही प्रतिसरकारनं लोकसुधारणेचीच कामं अधिक केल्यानं भूमिगतांबद्‌दल लोकांमध्ये जिव्हाळा निर्माण झाला. सातारा जिल्हयातल्या काही तालुक्यातील गावामधून मागमूसही नव्हता, ''इमानी'' सरकारी नोकरांनी मात्र संधीचा फायदा घेऊन अनेक गावांवर दंड बसवले व अन्यायाने हजारो रुपये वसूल करुन सरकारी खजिन्याची भर केली. असे असेल तरी, सत्ता काबीज करण्याचे मुंबईच्या बैठकीत जे ठरल होतं ते या जिल्यात हरेक मार्गानी तडीस नेले या सर्वच कारभाराच्या ग्रामराज्याचे स्वरुप प्राप्त झाले होते. स्वातंत्र्योत्तर काळात ४२ चा हुरुप व अस्मिता कुशलतेने मातीस मिळविली गेली. इंगळासारखे रसरसणारे छोटे—मोठे लढाऊ नेतृत्व आज कोळसा होऊन पडे आहे. त्याची अस्मिता गळून गेली आहे. तो धगधगता स्वातंत्र्यलढयाचा इतिहास हा अस्सल इतिहास होता. त्याला मान्यता दिली पाहिजे. हा विचारही अस्तित्वात नाही. पण इतिहास वाटचाल थांबवित नसतो. ती गती कोणीही रोखू शकत नाही.

**निष्कर्ष:—**

प्रतिसत्तेच्या अंमलाखालील गावात चोरी दरोडा बंद होता त्यांना केवळ ग्रामन्यायालयातच नव्हे. तर जनता कोर्टातही जाहीर शिक्षा होई. गावातील न्याय गावातच होई. तिथे मिटला नाही तर वरिष्ठ न्यायमंडळे न्याय करीत. तो न्याय बिना मोबदला मिळे. त्यामुळे अतिक्रमणे सावकारीखाली बळकावलेली जमीन इतर मालमत्तेतील तंटे व वाटणी खरेदीतील तंटे यांना वस्तुनिष्ठ व त्वरीत न्याय मिळे. न्यायाची दलाली बंद पडली. प्रतिसत्तेच्या नियंत्रणाखाली प्रौढशिक्षण आरोग्य, न्याय, सेवा, पिण्याचा पाण्याचा प्रश्न, शेतीचा प्रश्न, आदी प्रश्नांची सोडवणूक करुन सामुदायिक निर्णयाने सुविधा तयार करुन दिल्या होत्या.

साताराच्या प्रतिसरकामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्राात भरपूर प्रगती झाली आहे. सहकार क्षेत्रातून ग्रामीण नेतृत्वाचा उदय झाला. खेडयापाडयात शिक्षणसंस्था स्थापन झाल्या छोटे मोठे उद्योग उभा राहिले. आजच्या महाराष्ट्राची जी काही प्रगती झाली आहे. सर्वक्षेत्रात त्याचे मूळ कारण ४२ च्या स्वातंत्र्यचळवळीतील साता—याच्या प्रतिसत्तेच्या कार्यपध्दतीत आपणास दिसते.

**संदर्भ ग्रंथ:—**

१) दलितमित्र तांबटकाका — संपादक, प्रा.दिनकर पाटील, प्रा.जे.के.पवार
२) क्रांतीसिंह नाना पाटील— संपादक, डॉ. जयसिंगराव पवार
३) श्रमिकांचे कैवारी — प्रा. मो. नि.ठोके
४) साताराचा सिंह — राघव शिवणीकर
५) क्रांतीसिंह नाना पाटील — प्रा. विलास पाटील
६) पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य — जी. डी. लाड.
७) बहुजन समाजाचे शिल्पकार — भाई माधवराव बागल
८) क—हेचे पाणी खंड ३ — आचार्य प्र.के.अत्रे
९) कृष्णाकाठ — यशवंतराव चव्हाण
१०) यशवंतराव इतिहासाचे एक पान — श्री. रामभाऊ जोशी
११) मंतरलेले दिवस, तिळ आणि तांदूळ — ग.दि. माडगुळकर